- जर मी एच.आ.व्ही. बाधित व्यक्तिची पत्नी/पती असेन तर मला त्याच्या जागी कामावर लागण्याचा हक्क आहे का ?

जर तुमची पत्नी/पती सरकारी किंवा सार्वजनिक क्षेत्र मध्ये काम करत होता/असाल आणि नियोक्त्याची जर अनुकंपा योजना असेल तर अवलंबित घटक सहानुभूती तत्वावर म्हणून अर्ज करू शकता. पण हा अर्ज करताना तुम्ही काम करण्यास सक्षम व त्या कामासाठीचे योग्य ते शिक्षण घेतलेलं असणं आवश्यक आहे.

- पण मी ही जर एच.आय.व्ही. बाधित असेन तरीही हा फायदा मला मिळू शकतो का ?

सर्व कर्मचाऱ्यांचा त्यांच्या कोणत्याही परिस्थीती व्यतिरिक्त त्यांच्या सेवांत लाभावर हक्क आहे. तुम्ही रोजगाराशी संबंधीत फायदे जसे पेन्शन, प्रॉव्हीडंड फंड, घरासाठी कर्ज शिवाय पती/पत्नी व मुलांशी संबधित सर्व फायद्यांचे हक्कदार आहात. तथापी, विमा उतरवलेल्या व कर्मचारी विमा योजनेत सहभागी असणाऱ्या कर्मचाऱ्याला वैद्यकीय सेवा मिळणं हाही कर्मचारी विमा राज्य कायद्यान्वये हक्क ठरतो.


**लॉयर्स कलेक्टिव्ह एच.आई.वी./एड्स यूनिट तर्फे जे एच.आई.वी./एड्स बाधित आहेत अशा लोकांसाठी मोफत कायदेशीर साहय्यता व सल्ला दिला जातो. आमच्याशी येथे संपर्क साधा :**

- तळ मजला, जलाराम कृपा, ६१, जन्मभूमि मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
  दूरध्वनी : ०२२-२२८७५४८२ / ३, २२८३२७७९ फैक्स : ०२२-२२८२१७२४
  ई-मैल : aidslaw@lawyerscollective.org
- ६३/२, मस्जिद रोड, पहिला माळा, जंगपुरा, नई दिल्ली -१४.
  दूरध्वनी : ०११-२४३७७१०१/२/२२३७ फैक्स : ०११-२४३७२२३६
  ई-मैल : aidslaw1@lawyerscollective.org
- पहिला माळा, ४ए, एम. ए. हुसैन रोड, ऑफ पार्क रोड, टस्कर टाऊन, शिवाजी नगर, बैंगलोर-५६० ०५१
  दूरध्वनी : ०८०-४१२३९१३० / १ फैक्स : ०८०-४१२३९२८९ -
  ई-मैल : aidslaw2@lawyerscollective.org

वेबसाईट : www.lawyerscollective.org


# एच.आई.वी./एड्स ने तुम्ही बाधित आहात का ?



# हक्कांची माहिती करून घ्या

## रोज़गार

- मी एच.आय.व्ही. बाधित आहे म्हणून मला नोकरीसाठी नाकारले किंवा नोकरीवरुन काढून टाकले जाऊ शकते का ?

नाही. जर तुम्ही नोकरी करताना सर्व योग्य ती कामे करण्यास सक्षम असाल व शिकलेले असाल आणि तुमच्यापासून इतरांना काही त्रास, धोका असण्याची शक्यता नसेल तर सरकारी/सार्वजनिक क्षेत्रातील नियोक्ता तुम्हाला एच.आय.व्ही. बाधित आहात म्हणून नोकरीवरून काढून टाकू शकत नाही किंवा नोकरी नाकारू शकत नाहीत.

मुंबई उच्च न्यायालयात MX v ZY एम एक्स विरुद्ध झेड वाय यांच्या निकालात स्पष्ट झाले आहे की भारतीय संविधानानुसार कोणालाही काम करण्याच्या त्याच्या मूलभूत हक्कापासून वंचित करता येत नाही व सर्वांना समान वागणूक व कमावण्याची संधी दिली पाहिजे.

जोपर्यंत तुम्ही काम करण्यास सक्षम आहात व इतरांना तुमच्यापासून संभाव्य धोका नाही तोपर्यंत तुम्ही एच.आय.व्ही. बाधित आहात म्हणून तुम्हाला नोकरी वरून काढून टाकले जाऊ शकत नाही

- जर मी एच.आय.व्ही. बाधित आहे म्हणून मला कामावरून काढून टाकल्यास मला काय उपाय उपलब्ध आहेत ?

तुम्ही एच.आय.व्ही. बाधित आहात म्हणून तुम्हाला कामावरुन काढले जाऊ शकत नाही पण यदाकदाचित असं घडलच तर त्यासाठी कायद्याद्वारे अनेक मार्ग विविध प्रकरणांसाठी उपलब्ध आहेत. पुन्हा नोकरीवर रुजू होण्यासाठी तुम्ही या विरोधात कामगार किंवा औद्योगिक कोर्टात जाऊ शकता. येथे काम झाले नाही तर तुम्ही मोबदला मिळण्यासाठी दिवाणी न्यायालयात किंवा उच्च न्यायालयात जाऊ शकता. जर तुम्ही सरकारी/सार्वजनिक क्षेत्रा मध्ये कार्यरत असाल तर नोकरीमधून काढून टाकण्याविरुद्ध, मूलभूत हक्कासाठी तुम्ही लढू शकता.

- जर माझ्या वैद्यकिय बाबींमूळे मी कार्यरत असलेल्या भागात मी काम करण्यास सक्षम नसेन तर माझी याच संस्थेच्या किंवा कार्यालयाच्या दूसऱ्या विभागात बदली होऊ शकते का ?

जर तुमच्या वैद्यकीय बाबींमूळे तूम्ही काम करण्यास सक्षम नसाल तर तुम्ही दूसऱ्या विभागात बदली मागू शकता. पण या बदलामूळे नियोक्त्यावर आर्थिक किंवा प्रशासकीय बोजा पडला नाही पाहिजे.

- मला नोकरी देताना किंवा दिल्यानंतर नियोक्ता सक्तीची एच.आय.व्ही ची चाचणी ही वैद्यकीय चाचणीचा भाग करु शकतो का ?

नाही. वैद्यकीय चाचणीचा मुख्य उद्देश म्हणजे व्यक्ती दिलेलं काम योग्य पद्धतीने करू शकतो की नाही व ती कामे करण्यास सक्षम आहे की नाही हे पाहणे असतो. व्यक्तिच्या कामाशी संबंधीत तिची/त्याची कार्यक्षमता तपासण्यासाठी वैद्यकियचाचणी असते जसं हृदय, डोळे, श्वसनक्रिया इ. एच.आय.व्ही. टेस्टमूळे त्या व्यक्तिची कार्यक्षमता समजू शकत नाही. सरकारच्या तपासणीच्या धोरणाप्रमाणे एच.आय.व्ही. चाचणी ही सक्तीची किंवा नोकरी देतानाची अट होऊ शकत नाही किंवा नोकरीनंतरही ही तपासणी सक्तीची होऊ शकत नाही.

एच.आय.व्ही. ची चाचणी हा वैद्यकीय चाचणीमध्ये ऐच्छीक भाग असावा व कर्मचाऱ्याची त्यासाठी संमती घेतलेली असावी.

तथापी, वरील बाबी खाजगी नियोक्त्यांच्या बाबतीत लागू होत नाहीत.

- मी एच.आय.व्ही. बाधित असल्याचं नियोक्त्याला कळवणं गरजेचं आहे का ?

नाही. तुम्ही एच.आय.व्ही. बाधित असल्याचं नियोक्त्याला कळवण्याचं बंधन तुमच्यावर नाही. जोपर्यंत तुम्ही काम करण्यास सक्षम आहात व आपलं कार्य योग्य रितीने करत असाल तर संविधानिक कायदयातंर्गत हे जरुरी नाही.

- डॉक्टर माझ्या नियोक्त्याला मी. एच.आय.व्ही. बाधित असल्याची माहिती देऊ शकतो का ?

एखाद्या रूग्णाचं एच.आय.व्ही. बाधित असणं किंवा नसणं हे डॉक्टरांनी अतिशय गुप्त ठेवण किंवा रूग्णांच्या वैद्यकीय माहितीची गुप्तता ठेवणे हे डॉक्टरांचे कर्तव्य आहे परंतु कर्मचाऱ्याच्या संमतीने जी उगड किंवा अप्रत्यक्ष असेल तर डॉक्टर ही माहिती नियोक्त्याला देऊ शकतो.